cmyk

• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक २७९ • सोमवार,दि. ८ जानेवारी २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये

• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 279 • Monday 8 Janewari 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
| बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

## संपुर्ण महाराष्ट्र माझ्यासोबत-ठाकरे



मुंबई । वृत्तसंस्था

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे प्रमुख आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत आज मातोश्री या निवासस्थानी मराठी अभिनेते किरण माने यांच्यासह मनसे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेतील कार्यकर्त्यांनी शिवसेना (उबाठा) पक्षात प्रवेश केला. या पक्षप्रवेशावेळी उद्धव ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार हल्लाबोल करत त्यांना एक आव्हानही दिलं आहे. एवढे खोके घेऊनही, घटनाबाह्य सरकारला उठता बसता उद्धव ठाकरे दिसतात. कारण उद्धव ठाकरे एकटा नसून माझ्यासोबत संपूर्ण महाराष्ट्र आहे. लढाई मोठी आहे, पण तुमच्यासारखे कट्टर शिवसैनिक एकवटले; तर ही लढाई सोपी आहे. सत्ताधाऱ्यांना माझं आव्हान आहे की लोकसभा, विधानसभा निवडणुका एकत्र लावून दाखवा, असं आव्हान उद्धव ठाकरे यांनी दिलं आहे. गद्दारी करणाऱ्यांना शिवसेना एकच धक्का अशी देते, की ते भुईसपाट होतात, असंही यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले. लोकसभा ▶▶ पान २ वर

# मराठ्यांची पोरं क्लास वन होण्यासाठी आंदोलन

तीर्थपुरी । वृत्तसेवा

आरक्षणाअभावी मराठ्यांच्या पोरांचे आयुष्य उद्ध्वस्त होत असून तुमच्या बहानेबाजी आणि गप्पा ऐकण्यासाठी आम्ही आंदोलन उभे केले नाही तर ते पोरं क्लास वन कसे होतील यासाठीचे हे आंदोलन आहे. हे आंदोलन मॅनेज होण्यासाठी नाही किंवा पैसे कमवून नेतृत्व करण्यासाठी नाही, तर गोरगरिबांचे पोरं शिकून आपल्या पायावर कसे उभे राहतील हे उघड्या डोळ्यांनी एकदा बघायचे आहे. आता लढाई अंतिम टप्प्यावर आली असून, त्यासाठी मागे न हटता मुंबईला मोठ्या संख्येने चला, असे आवाहन मनोज जरांगे यांनी घनसावंगी तालुक्यातील तीर्थपुरी येथे आयोजित गाठीभेटी दौऱ्यात केले.

ओबीसी बांधवांनाही राजकीय खेळी कळाली जरांगे यांनी मंत्री छगन भुजबळ यांचे नाव न घेता त्यांच्यावर जोरदार टीका करत हा राजकीय माणूस असून सामान्य ओबीसींना एकत्र करून हे स्वतःच्या केसेस मागे घेऊन आपले राजकीय वजन वाढवायला लागला. हे आता ओबीसी बांधवांच्याही चांगले लक्षात आले आहे. त्यामुळे मराठा आरक्षणामुळे धनगर व वंजारी बांधवांच्या आरक्षणाला कुठलाही धक्का लागणार नसल्याने त्यांनी आरक्षणाला विरोध करू नये, असे ते म्हणाले.



## मराठ्यांविरूध्द गरळ ओकणारे अपघाताने उपमुख्यमंत्री झाले; जरांगे पाटलांचा पलटवार

मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी काहीही झालं तरी येत्या २० जानेवारीरोजी आम्ही मुंबईत येणारच आहोत, असा निर्धार मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे – पाटील यांनी व्यक्त केला आहे. तर, कुणीही कायदा हातात घेतला तर त्याचा मुलाहिजा ठेवणार नाही, अशा शब्दांत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जरांगे – पाटील यांना इशारा दिला आहे. यावर जरांगे –पाटील यांनीही पवार यांच्यावर पलटवार करत जशास तसे उत्तर दिले आहे. . गोदा पट्यातील १२३ गावांच्या दौऱ्यात ते अंबड तालुक्यातील दह्याळा गावात पत्रकारांशी बोलत होते. मराठ्यांना तुमच्या विरोधात बोलायला लावू नका, ▶▶ पान २ वर

# बीड मतदार संघावर सत्ताधाऱ्यांकडून होणारा अन्याय सहन करणार नाही -आ.संदीपभैय्या

## जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आ.संदीपभैय्या आक्रमक; विकास कामांसह, विविध विषयांवर केली चर्चा



बीड । प्रतिनिधी

सत्ता बदल झाल्यापासून बीड मतदारसंघात सातत्याने विकासकामांत खोडा आणण्याचे प्रकार सुरू आहेत. मिळालेला निधी परत पाठवणे, वळवणे, कामांना स्थगिती देणे अशाप्रकारचे अन्यायकारक कृत्य राजकीय द्वेषातून केले जात आहे. यावर रविवार (दि.७) रोजी बीड येथे झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आ.संदीप क्षीरसागर यांनी आक्रमक होत जाब विचारला. राजकारण, राजकारणाच्या मैदानात नागरी विकासाच्या दृष्टीने महत्वकांक्षी कामे अडवून जनतेवर अन्याय कशाला करता? घोडामैदान याचवर्षी आहे, तिथे लढा! असे सांगत बीड मतदारसंघावर होनारा अन्याय सहन करणार नसल्याची भूमिका स्पष्ट केली. रविवार (दि.७) रोजी बीड जिल्हा नियोजन समितीची बैठक पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत आ.संदीप क्षीरसागर यांनी, संपूर्ण बीड जिल्ह्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती असल्याचे घोषित होऊनही शासनस्तरावरून आवश्यक त्या उपाययोजना केल्या नसल्याने काही दिवसांपूर्वी जिल्हाधिकार्यांना निवेदन दिले होते. त्याबाबत चर्चा केली. दि.१६ ऑक्टोबर रोजी च्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीपुर्वी दि.११ ऑक्टोबर रोजी सर्व विभागाला विकास कामांच्या बाबतीत पत्र दिलेले आहेत. त्या बाबतीत काय निर्णय झाला? याबाबत विचारणा केली. ळ–झरी प्रणाली अंतर्गत प्रशासकीय मान्यतांची माहिती पत्राद्वारे मागितली असता मला अजुनही देण्यात आलेली नसून दि.१६ ऑक्टोबर रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त कायम करताना अनुपालनास मान्यता घेताना, या विषयी सभागृहात चर्चा होणे गरजेचे आहे अन्यथा बीड मतदार संघातील अनेक कामे दुबार अथवा Overlapping होण्याची शक्यता व्यक्त केली. आवश्यक असलेल्या माहिती मागितल्यास अधिकार्यांकडून कसल्याच प्रकारचे उत्तर मिळत नाही. आज होत असलेल्या बैठकीचे निमंत्रण व मागील बैठकीचे इतिवृत्त सात ते दहा दिवसांपुर्वी देणे आवश्यक आहे. परंतु ते दि.४ जानेवारी रोजी देण्यात आले आहे. दि.१६ ऑक्टोबरच्या बैठकीचे निमंत्रण दहा दिवस अगोदर देण्यात आलेले नाही. त्यामुळे मला त्या बैठकीला उपस्थित राहता आले नाही. अशी तक्रार व्यक्त केली. सध्या मिळालेल्या इतिवृत्तामध्ये जिल्हा परिषद, नगर परिषदेने सुचविलेली कामे प्रस्तावित दिसून येत नाहीत. जिल्हा नियोजन समिती गठीत नसल्याने ही समिती कार्यरत असल्याचे शासन परिपत्रक आहे का? समितीच्या बैठकीतील अधिकार, मा.पालकमंत्री यांना देणे बंधनकारक आहे? असल्यास त्या बाबतचे शासन परिपत्रक मला देण्यात यावे. अशी मागणीही आ.क्षीरसागर यांनी यावेळी केली. आ.संदीप क्षीरसागर यांनी मतदारसंघातील पुढील मुद्दे उपस्थित करत चर्चा केली २०२० चा रखडलेला पीकविमा बीड, गेवराई व वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करा असे निर्देश डिसेंबर २०२२ मध्ये राज्य तक्रार निवारण समितीने दिले होते. परंतु एक वर्ष उलटल्यानंतरही अद्यापपर्यंत त्याची अंमलबजावणी झालेली नाही. सन २०२३ मध्ये सोयाबीन पिकाला २५ टक्के अग्रीम देण्यात आला. उर्वरित ७५ टक्के अग्रीम देण्यात यावा. त्यासोबतच इतर पिकांनाही अग्रीम मंजूर करण्यात यावा. तसेच ५ एक्करच्यावरील अग्रीम अजूनही शेतकऱ्यांना मिळालेला नाही. तो देण्यासाठी आदेश करावेत. १० नोव्हेंबर २०२३ च्या परिपत्रकानुसार नुकसानीचे पंचनामे करण्यात आलेले नाहीत. शेतकरी कर्जाचे पुनर्गठन करणेसाठी बँकेला आदेशीत करावे. शिरूर का. तालुक्यातील भानकवाडी ते साळुंके वस्ती या रस्त्यावर नळकांडी पूल नसल्याने गेल्यावर्षीच याठिकाणी तीन बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्यामुळे या घटनेचे गांभीर्य ▶▶ पान २ वर

## तलाठी भरती घोटाळ्याची चौकशी व्हावी –विजय वडेट्टीवार

मुंबई । वृत्तसंस्था



तलाठी भरती परीक्षा हा एक मोठा घोटाळा आहे. या संपूर्ण घोटाळ्याची एसआयटी चौकशी व्हावी, अशी मागणी राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. २०० पैकी २१४ गुण एका उमेदवाराला मिळत असेल, तर परीक्षा घेणारी संपूर्ण यंत्रणा किती गंभीरतेने काम करत आहे. आणि सत्ताधाऱ्यांनी पदभरतीचा कसा खेळखंडोबा करून ठेवला आहे, आता स्पष्ट होत आहे, अशी टीका त्यांनी राज्य सरकारवर केली आहे. तलाठी भरती परीक्षा हा एक मोठा घोटाळा आहे. या संपूर्ण घोटाळ्याची चौकशी व्हावी ही आमची मागणी आहे. २०० पैकी २१४ गुण एका उमेदवाराला मिळत असेल तर परीक्षा घेणारी संपूर्ण यंत्रणा किती गंभीरतेने काम करतय आणि सत्ताधाऱ्यांनी पदभरतीचा कसा खेळखंडोबा करून ठेवलंय हे आता स्पष्ट होत




# संस्कारीत पिढी निर्माण करण्यासाठी शिक्षकांचे योगदान महत्त्वाचे -जयदत्तअण्णा

बीड । प्रतिनिधी

बदलत्या युगात संस्कारीत पिढी निर्माण करण्यासाठी पालकांबरोबरच शिक्षकांचे देखील तितकेच योगदान महत्त्वाचे ठरू लागले आहे. आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित नव्या शिक्षणाच्या वाटा आता खुल्या झाल्या असून या माध्यमातून चांगले आयुष्य घडवण्यासाठी पर्याय उपलब्ध झाला असल्याचे मत माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी व्यक्त केले आहे. क्रांतिकारी शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने भारतरत्न मौलाना अब्दुल कलाम आझाद आदर्श पुरस्कार वितरण सोहळा आज बीडमध्ये आयोजित करण्यात आला होता. यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी राज्यभरातून निवडलेल्या शिक्षकांना माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित केले. यावेळी बोलताना माजीमंत्री क्षीरसागर म्हणाले की, क्रांतिकारी शिक्षक संघटनेची बांधणी आणि संघटनेची वाटचाल ही त्यांच्या सदस्यांच्या बळावर उत्तमरीत्या चालू आहे आज या संघटनेच्या वतीने राज्यभरातून अनेक शिक्षकांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येत आहे ही अभिमानाची गोष्ट आहे पुरस्कार दिल्यानंतर त्यातून प्रेरणा घेऊन आणखी चांगले काम करण्यासाठी उत्साह निर्माण होतो. शिक्षकांचे स्थान मोठ्या उंचीवर आहे सध्याच्या परिस्थितीत खूप मोठे परिवर्तन झाले आहे आयुष्य घडवण्यासाठी शिक्षण क्षेत्रात अनेक दरवाजे खुले झाले आहेत पण आजच्या परिस्थितीत लहान मुलांवर जे संस्कार व्हायला हवेत त्याही पुढे जाऊन त्यांच्या मनावर वेगवेगळे विचार रुजू लागले आहेत शिक्षकांची भूमिका खूप महत्त्वाची ठरवू लागली आहे मुलांवर उत्तम संस्कार करत त्याला उत्तम विद्यार्थी घडवण्याचे काम पालकांच्या बरोबरच शिक्षकांवर देखील येऊन ठेपले आहे दिवसभर शिक्षक आणि त्यानंतर पालक अशा परिस्थितीत विद्यार्थ्यावर योग्य ते संस्कार करण्यासाठी दोन्हीकडूनही प्रयत्न झाले पाहिजे आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण येऊ लागले आहे माणसापेक्षा यंत्राद्वारे सगळी कामे कशी करून घेता येतील याचे तंत्रज्ञान दिवसेंदिवस विकसित होऊ लागले आहे त्यामुळे त्याच तोलामोलाचे शिक्षण विद्यार्थ्यांना देणे महत्त्वाचे ठरणार आहे,यावेळी मोठ्या संख्येने संघटनेचे पदाधिकारी,शिक्षक,नागरिक उपस्थित होते.



cmyk

# महाराष्ट्रासह मराठवाड्यावर पाण्याचं भिषण संकट, सरकार सत्तेत मग्न

**मुंबई । वृत्तसंस्था**

महाराष्ट्राचे राजकारण एका विचित्र वळणावर येऊन ठेपले असताना अर्ध्या महाराष्ट्राची पाण्यासाठीची वणवण सुरू आहे. या प्रश्नाची गांभीर्याने चर्चा होऊन लोकांना आधार देणारा कार्यक्रम आखण्याची गरज आहे; पण, सर्वच पक्षीय राजकारणी मंडळी आणि त्यांचे कार्यकर्ते निरर्थक विषयांवर वाद-प्रतिवाद करीत जनतेचा अंत पाहत आहेत.

परिणामी, सर्वच आमदार-खासदारांना मंत्र्यांसारखी सुरक्षा घेऊन फिरावे लागत आहे. प्रत्येकास मागे-पुढे पोलिस गाडी देण्याची तरतूद करण्यात आली आहे. पाऊसमान कमी झाल्याने खरीप तथा रब्बी हंगामातील पिकांचा उतारा ढासळला आहे. कांद्यासारख्या नाशवंत शेतमालाच्या किमती पाडण्यासाठी तत्परतेने निर्यातबंदी, साठाबंदीसारख्या उपाययोजना करण्याची मुभा केंद्र सरकारला देऊन राज्यातील राज्यकर्ते शेतकऱ्यांच्या अडचणीकडे पाहत बसले आहेत.

मराठवाडा तर नेहमीप्रमाणे जळतो आहे. ती आग विझविण्यासाठीही पाणी नसणार आहे. कारण या विभागात सर्वांत कमी पाऊस मान्सूनच्या कालावधीत झाला आहे. त्या दूरदूरवरच्या गावांना पाणीटंचाईची झळ आतापासूनच जाणवणार आहे. गोदावरीचा नदीकाठ वगळता उर्वरित मराठवाड्यासाठी सरकारने काही मदत केली, तरच कसाबसा यावर्षीचा उन्हाळा पार पाडू शकेल; अन्यथा पुणे- पिंपरी- चिंचवडच्या औद्योगिक पट्ट्यात स्थलांतराशिवाय पर्याय राहणार नाही. मध्यंतरी एक बातमी आली होती की, पुण्यात शिक्षणासाठी असलेल्या मराठवाड्यातील मुलींसाठी शेतकरी मायबाप पैसे देऊ शकत नसल्याने त्या एकवेळ जेवून ज्ञानार्जन करता आहेत.

पाऊस कमी तर झालाच; शिवाय तो वेळीअवेळी पडल्याने शेतीचे पार नुकसान झाले आहे. १३ जिल्ह्यांतील पावसाची सरासरी अवकाळीने विशेषत: मराठवाडा आणि विदर्भात धुमाकूळ घातल्याने कमी-



अधिक झाली असेल. राज्य सरकारने ५० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झालेल्या ४० तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला आहे. त्यापैकी २४ तालुके अतिगंभीर परिस्थितीत आहेत. याशिवाय १७८ तालुक्यांतील ९५९ महसुली मंडळात दुष्काळ जाहीर केला आहे. अशा प्रकारे ३५३ पैकी २१८ तालुक्यांना कमी पावसामुळे दुष्काळाचा सामना करावा लागत आहे.

महाराष्ट्राने ग्रामीण भागातील पाणीटंचाई आणि रोजगारनिर्मितीसाठी १९७२ अनेक प्रयोग केले आहेत. पाझर तलावापासून अलीकडच्या शेततळ्यापर्यंत विविध योजना राबविल्या आहेत. तरीदेखील ग्रामीण भागातील समस्यांची दाहकता कमी झालेली नाही. पाझर तलाव असो की शेततळी, पाऊस झाला तर ती भरतील. पाणीसाठा होईल. भूजल पातळी वाढेल. पाणीटंचाईची झळ कमी होईल.

मात्र, उपलब्ध पाणी आणि किफायतशीर पीक पद्धती यावर काम करणारा ग्रामविकासमंत्री आणि कृषिमंत्रीच चांगला भेटत नाही. इतक्या उपाययोजना कोणत्याही राज्याने केल्या नसल्या तरी त्या अपुऱ्या पडत आहेत. याचाच अर्थ या उपाययोजना अपुऱ्या आहेत किंवा कालबाह्य तरी झाल्या आहेत. पाण्याची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी चौफेर काम करावे लागणार आहे. अर्धा महाराष्ट्र पाण्यासाठी वणवण भटकणार आहे.

त्याची सुरुवात डिसेंबर महिन्यापासूनच झाली आहे. त्याची झळ मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, आदी रोजगार देणाऱ्या शहरांनाही बसणार आहे. तेव्हा महाराष्ट्र राज्याने सर्वसमावेशक पाणी धोरण तयार करून उपाययोजना कराव्या लागतील; अन्यथा लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत वणवण भटकणाऱ्यांचे कोरडे घसे शासनाच्या विरोधी आवाज काढतील. तेव्हा लोकप्रतिनिधींना पोलिस संरक्षणातही फिरता येणार नाही. घरीच बसावे लागेल.

महाराष्ट्रात इतकी गंभीर परिस्थिती जेव्हा जेव्हा निर्माण झाली तेव्हा तेव्हा विरोधी पक्षांनी शेतकऱ्यांच्या सभा, मेळावे आणि मोर्चे आयोजित करून त्यांचा आवाज बुलंद करीत राज्य सरकारला हालवून ठेवलेले असायचे. आता बुलढाण्याचे रविकांत तुपकर किंवा अमरावतीतील आमदार बच्चू कडू आणि माजी खासदार राजू शेट्टी वगळता एकही जण तोंड उघडत नाही, ही गंभीर राजकीय कोंडी निर्माण झाली आहे. काँग्रेस आणि भाजप या प्रमुख पक्षांनी यात महत्त्वाची भूमिका बजावणे अपेक्षित होते.

भाजप राजकीय फोडाफोडीचा खेळ करीत बसला आहे आणि काँग्रेस पक्ष जनतेसोबत राहण्याचा आत्माच हरवून बसल्याप्रमाणे वावरतो आहे. कोण सत्तारूढ आणि कोण विरोधी पक्ष याची सीमारेषाच पुसून टाकण्यात आली आहे. पाच वर्षांच्या एका विधीमंडळात सर्वच सत्ताधारी आणि विरोधक होण्याचा विक्रम केला आहे. महाराष्ट्रात सरासरी पाऊस कमी झाल्याने पाणी साठवण क्षमताही गाठू शकला नाही.

कोयनासारख्या खात्रीच्या पर्जन्यमानाच्या पाणलोट क्षेत्रातील धरणही चौदा टीएमसीने कमी भरले. कमी-अधिक सर्वच धरणांची ही अवस्था आहे. मराठवाड्याची जीवनवाहिनी असलेले जायकवाडी धरण निम्मेही भरले नाही. सोलापूर-पुणे सीमेवरील उजनी धरणाचीही तीच अवस्था झाली आहे. या धरणांचे पाणलोट क्षेत्रच तुटीचे आहे, हा भाग वेगळा! त्यामुळे नाशिक विभागातील धरणांचे पाणी सोडल्याशिवाय जायकवाडीचा साठा वाढत नाही.

तो न वाढल्याने शेतीच नव्हे, तर छत्रपती संभाजीनगर, जालना या शहरांसह संपूर्ण मराठवाड्याचा घसाच कोरडा पडण्याची वेळ आली आहे. अखेर या वादावर उपाययोजना करणारे नेतृत्व खुजे पडल्याने मुंबई उच्च न्यायालयास नोंद घ्यावी लागली. इतके या राजकीय नेत्यांचे पुतनामावशीचे प्रेम महाराष्ट्राच्या सर्व विभागावर आहे, हे स्पष्ट झाले.

उजनी धरणाचा साठा तर डिसेंबर महिन्यातच ४० टक्क्यांवर आला आहे. सोलापूर जिल्हा जणू दररोज पाऊस पडणार, महाराष्ट्राचा ब्राझील असल्याप्रमाणे प्रचंड पाणी पिणाऱ्या उसाचे आगार करून टाकले आहे. सर्वाधिक साखर कारखान्यांचा जिल्हा म्हणून गौरवाने मिरवण्याचीही बाब नाही. येत्या उन्हाळ्यात सोलापूर शहरातील नागरिकांना पाणी विकत घेऊन पिण्याची वेळ आली तर आश्चर्य वाटायला नको. खासगी साखरसम्राटांनी सोलापूर या कोरड्या हवेतील शेतीसाठी उत्तम असणाऱ्या जिल्ह्याची वाट लावली आहे. पश्चिम महाराष्ट्रात पाण्याची कमतरता नाही, पण साठविलेले पाणी पूर्वेकडील दुष्काळी पट्ट्यात (पाथर्डी ते जत तालुका) देण्याची व्यवस्था करण्यात आलेली नाही. सातारा ही कृष्णा नदीच्या खोऱ्याची जन्मदात्री भूमी आहे. त्या जिल्ह्यात ऑक्टोबरपासूनच टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. राजकारणाचे सतत बार उडविणाऱ्या नेत्यांच्या या जिल्ह्यांतील ही विदारक स्थिती, त्यांची मान शरमेने खाली जात नाही, इतके ते निर्ढावलेले आहेत.

पान १ वरून....

## मराठ्यांविरूध्द गरळ ओकणारे

तुम्हाला हे शेवटचं सांगणे आहे. मराठ्यांच्या विरोधात बोलू नका, अन्यथा तुमच्याकडे बघावं लागेल. तुम्ही अपघाताने झालेले उपमुख्यमंत्री आहात, तुम्हाला मराठा समाज उत्तर देईल, असेही जरांगे यावेळी म्हणाले. मराठ्यांच्या नोंदी सापडल्या आहेत, त्यामुळे मराठ्यांना आरक्षण ओबीसी मधूनच पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले. चरपेक्ष गरीरपसश-झरींळश्र जरांगे -पाटील म्हणाले की, अजित पवार यांच्या पोटातले ओठांवर आले आहे. अजित पवार यांना नोंदी सापडलेल्या माहित नाहीत का? ते महाराष्ट्रातच राहतात का? राज्यभरात ५४ लाख नोंदी सापडल्या आहेत, असे मुख्यमंत्र्यांसह अर्धे मंत्रिमंडळ सांगत आहे. तसेच कायदा पारित करण्यासाठी आम्हाला नोंदी आवश्यक आहेत, त्या नोंदी सापडल्या आहेत, असे गिरीश महाजन यांनी सांगितले आहे. संविधानाच्या चौकटीतच आरक्षण मिळेल, असे असताना ते विरोधात का बोलतात? असा सवाल जरांगे- पाटील यांनी केला आहे. कायद्याची चौकट तुम्हाला कळते, ती वेगळी असते आणि करतात ते वेगळं असते. ही खरी चौकट आहे. यात मराठा आरक्षणात बसतोय, विनाकारण मराठ्यांच्या विरोधात काहीही भाष्य करून मराठा समाज आणि सरकारमध्ये गैरसमज निर्माण करू नका. तुम्हाला बोलायचे तर मराठ्यांच्या बाजूने बोला, अन्यथा आत्तापर्यंत तुम्ही जसे गप बसले, तसं गप्प बसा, याच्यासाठीच तुम्ही गप्प बसला होतात का ? असा सवालही जरांगे- पाटील यांनी उपस्थित केला.

## संपुर्ण महाराष्ट्र माझ्यासोबत

निवडणुकीनंतर देशात सत्तांतर होणार असल्याचा दावा उद्धव ठाकरे यांनी आज केला आहे. बीडचे 'निर्भीड' शिवसैनिक पक्षात प्रवेश करताहेत. आज फुटलेल्या पालवीचा उद्या बीडमध्ये महावृक्ष होणार आहे. शिवसेनेसारखं प्रेम दुसऱ्या कोणत्याच पक्षात मिळत नाही. राजकारणात विरोधी पक्षातून सत्ताधाऱ्यांकडे जाणाऱ्यांचा ओघ जास्त असतो. पण आज तुम्ही सत्ता आणण्यासाठी इथे आला आहात. भविष्यात देशात सत्तांतर होणार आणि रामराज्य येणार, असा विश्वास उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, उद्धव ठाकरे यांनी यावेळी १३ जानेवारी रोजी आपण कल्याण लोकसभेचा दौरा करणार असल्याची घोषणाही केली आहे. यावेळी शिवसेनेच्या विविध शाखांना भेटी देणार असल्याचं त्यांनी सांगितलं. ठाकरे यांची ही घोषणा कल्याण-डोंबिवली लोकसभा मतदारसंघाचे विद्यमान खासदार आणि मुख्यमंत्र्यांचे सुपुत्र श्रीकांत शिंदे यांना दिलेलं आव्हान मानलं जात आहे. त्यामुळे शिवसेनेतील दोन गटांतील संघर्ष आगामी काळात आणखी टोकदार होण्याची शक्यता आहे.

## बीड मतदार संघावर

लक्षात घेऊन येथील नळकांडी पुलासाठी मंजूरी व निधी देण्यात यावा. बीड नगरपालिकेकडील महावितरणची ३६ कोटी रूपयांची थकबाकी भरण्यासाठी नगरपरिषदेकडे दिलेला निधी महावितरणकडे वर्ग करून बीड शहरातील अनियमित पाणीपुरवठ्याची समस्या कायमस्वरूपी सोडवण्यात यावी.

शहरातील नगर रोडवर बहुतांश ठिकाणी शासकीय विभागाच्या इमारती असल्याने जिल्हाभरातून महिला भगिनी याठिकाणी येत असतात. परंतु या ठिकाणांवर स्वच्छतागृहांची सोय नाही. त्यामुळे या व शहरातील आवश्यक त्या ठिकाणी महिलांसाठी स्वच्छतागृहांची व्यवस्था करण्यात यावी.

बीड नगर परिषदेकडून थकीत घरपट्टी व नळपट्टीवर व्याज आकारले जात आहे. सध्याची दुष्काळ सदृश्य परिस्थिती पाहता यामध्ये सूट देण्यात यावी.

शहरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची उंची वाढविण्याच्या कामास मंजुरी व निधी देण्यात यावा.

मुस्लिम समाजाच्या शिक्षण घेत असलेल्या मुलींसाठी वस्तीगृह मंजूर असून त्याकरिता जागा उपलब्ध करावी.

युवा शांतीवन, पाली व देवराई याठिकाणी सामाजिक वनीकरणासंबंधी उर्वरित कामे करण्यात यावी.

बीड मतदारसंघातील जरूड, बोरखेड, ढेकणमोहा, निळवंडी ता.बीड व खालापुरी ता.शिरूर येथे पशुवैद्यकीय दवाखाना इमारत बांधकामासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्यात यावा.

बीड शहरांतर्गत वीजेचे जुने पोल बदलून केबलद्वारे काम करण्यात यावे. पाली येथील ३३ के.व्ही. उपकेंद्राचे काम सुरू करावे. तसेच बीड व शिरूर तालुक्यात कृषी व सिंगल फेज डी.पी. देण्यात याव्यात.

श्री क्षेत्र नारायणगडसाठी मंजूर असलेल्या २३ कोटींच्या निधीची तरतूद शासन स्तरावर तात्काळ करावी. श्री क्षेत्र खंडेश्वरी देवस्थान पर्यटन विकास प्रस्तावास शासनस्तरावर मान्यता द्यावी. तसेच श्री क्षेत्र कपिलधार येथील १०० कोटींचा विकास आराखडा मंजूर करून त्यास शासनस्तरावर मान्यता द्यावी.

बीड विधानसभा मतदारसंघातील श्री क्षेत्र हनुमान मंदिर वायभटवाडी, श्री क्षेत्र किल्ले भगवानगड वंजारवाडी, श्री क्षेत्र साक्षात माता मंदीर देवस्थान साक्षाळपिंप्री, चंदनशाहवली दर्गाह चौसाळा, श्री क्षेत्र अंबाबाई देवस्थान देवीबाभुळगाव, सुलतान साहेब देवस्थान गोगलवाडी, श्री क्षेत्र खंडोबा मंदिर देवस्थान पाली, श्री क्षेत्र राणुबाई देवस्थान लोणीघाट, श्री क्षेत्र पोईचादेव देवस्थान मांजरसुंबा, क्षेत्र खंडोबा मंदिर देवस्थान कुक्कडगाव, क्षेत्र खंडोबा मंदिर देवस्थान जेबापिंप्री, श्री क्षेत्र महादेव मंदिर देवस्थान, कमळेश्वर धानोरा या तीर्थक्षेत्रांना 'क' दर्जा देण्यात यावा.

बीड तालुक्यातील बोरफडी, दगडी शहाजानपूर, मन्यारवाडी आरोग्य उपकेंद्र बांधकामास मंजुरी व निधी देण्यात यावा.

बीड व शिरूर का. तालुक्यात आवश्यक त्या ठिकाणी शाळा खोली बांधकाम करणे, शाळा दुरूस्ती करणे व शाळेला कंपाऊंड वॉल करणे. बीड मतदारसंघात, महिला व बालकल्याण विभागाच्या प्रकल्पात व प्रकल्प अंतर्गत अंगणवाड्यांमध्ये रिक्त पदे भरणे. तसेच नवीन अंगणवाडी खोल्या देण्यात याव्या.

बीड जिल्हा स्टेडियम, तालुका स्टेडियम व तालुका क्रीडा कार्यालयांतर्गत प्रस्तावित कामे करणे.

शासनस्तरावरून बीड जिल्ह्यासाठी ३० खाटांचे आयुष रूग्णालय छठक्च् अंतर्गत मंजूर असून त्यासाठी जागा उपलब्ध करून देणे.

बीड पंचायत समितीच्या आवारात स्व.आण्णासाहेब पाटील यांच्या पुतळा बसविणे बाबतच्या प्रस्तावास मान्यता देणे.

बीड व शिरूर का. तालुक्यातील १७ ग्रामपंचायतींना ग्रामपंचायत भवन बांधकाम करायचे असून त्यास शासनस्तरावर मंजुरीसह निधीसाठी पाठपुरावा करण्यात यावा.

बीड व शिरूर का. तालुक्यात जनसुविधेसाठी विशेष अनुदान अंतर्गत स्मशानभूमी संरक्षण भिंत व सुशोभीकरण करण्यात यावे.

बीड व शिरूर का. तालुक्यातील कोल्हापुरी बंधार्यांची दुरूस्ती करणे गरजेचे आहे.

पान ४ वरून...

## दुष्काळसदृश परिस्थितीच्या

सकामांच्या निधी वाटपाबाबत सूचना दिल्या. आ.नमिता मुंदडा यांनी केज येथील पाणी पुरवठा विभागाच्या जागेच्या प्रश्नासह ग्रामीण रस्त्यांच्या कामांकडे लक्ष वेधले. पशुसंवर्धन कार्यक्रमाचे अनुदान एक लाखांवरून वाढवून ५ लाखांपर्यंत करण्याची मागणीही त्यांनी केली. आ.सुरेश धस यांनी जिल्हा परिषद शाळांच्या दुरुस्तीसाठी वाढीव निधी मंजुरीची मागणी केली, असता ती मागणी मान्य करण्यात आली. पर्यटन-यात्रास्थळे यांच्या निधीत वाढ करण्यासह आष्टी महसुली इमारतीचे काम, पाटोदा तालुक्यातील वन्य जीवांमुळे विस्थापित गावाचा मुद्दा आदी कामांकडे आ.बाळासाहेब आजबे यांनी समितीचे लक्ष वेधले. आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रलंबित पीकविमा संदर्भात मुद्दा उपस्थित केला असता खरीप हंगाम २०२३ मधील अग्रीम पीकविमा आकडेवारी बाबत धनंजय मुंडे यांनी माहिती दिली. तसेच एक हजार पेक्षा कमी विमा रक्कम असणारे व विविध ऑनलाइन प्रक्रियेमुळे अडकलेले विमा प्रस्ताव जानेवारी अखेरच्या आत वितरित केले जावेत, असे निर्देश विमा कंपनीस दिले. यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर चिंचाने यांनी सादरीकरण केले, तसेच स्वागत, समन्वयन व आभार जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी व्यक्त केले. याशिवाय मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांसह सर्व विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## छत्रपती साखर कारखान्याचे

आंबेसेटर येथे संपन्न झाला या विवाह सोहळ्यास राज्यातील केन्द्रातील मंत्री गण यांच्या सह आमदार,माजी आमदार माजी मंत्री खा.यांची उपस्थित दिसुन आली. राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे, युवासेना प्रमुख माजी मंत्री आदित्यजी ठाकरे,माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर,माजी मंत्री सुरेशजी नवले,मा.माजी मंत्री बदामराव पंडित,माजी मंत्री राजेशभैया टोपे,,मा.सुभाषजी देसाई साहेब,मा.मिलिंदजी नार्वेकर , मा.खा.चंद्रकांतजी खैरे,,माजी मंत्री अर्जुनराव खोतकर, माजी मंत्री सुरेश नवले, मा.खा.जयसिंगराव गायकवाड, आ. सुरेशजी धस,आ. अभिमन्यू पवार साहेब,आ. लक्ष्मण आण्णा पवार, केंद्रीय गृहमंत्री यांचे पी.एस.ठोंबरे साहेब,मा.आ.राजेंद्रजी जगताप, मा.आ.किशनचंद तनवानी, मा.आ.केशवदादा आंधळे,मा.आ.शिवाजीराव चोथे बाबुराव पोटभरे, यांच्या सह राजकीय, सामाजिक क्षेत्रातील अन्य मान्यवर जगताप परिवाराच्या विवाह सोहळ्यास उपस्थित होते.

## दीनदयाळ बँकेत

आहे. ह.भ.प.मोरे हे जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांचे विद्यमान ११ वे वंशज आहेत. ते प्रसिद्ध कीर्तनकार, प्रवचनकार, शिवव्याख्याते ही आहेत. भक्ती-शक्ती हा त्यांच्या चिंतनाचा मुख्य विषय आहे, आजपावेतो त्यांनी विविध ठिकाणी शेकडो व्याख्याने दिली आहेत. ते गडकोटप्रेमी आहेत. त्यांनी १०० पेक्षा जास्त किल्ल्यांची भ्रमंती केली आहे. ते युवा लेखक, साहित्यिक असून त्यांचे शिवराज्याभिषेक हे पुस्तक प्रकाशित झाले आहे. महाराष्ट्र शासनाच्या शिवराज्याभिषेकानिमित्त प्रकाशित छत्रपतींच्या कर्तृत्वाची नीती या पुस्तिकेचे ते लेखक म्हणून ही ओळखले जातात. शिवशंभू विचार मंच, पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे ते काम पहातात. तसेच गुरूवार, दि.११ जानेवारी रोजी डॉ.पांडुरंग बलकवडे (पुणे) यांचे 'लोककल्याणकारी शिवराय व त्यांची राजनीती' या विषयावर व्याख्यान होईल. डॉ.बलकवडे हे ज्येष्ठ इतिहास संशोधक, शिवचरित्र व्याख्याते, मोडी लिपी तज्ज्ञ, पुरातत्ववेत्ते, दुर्ग अभ्यासक म्हणून ही सर्वदूर ओळखले जातात. ते भारत इतिहास संशोधक मंडळ, महाराष्ट्र राज्य शालेय अभ्यासक्रम मंडळ (बालभारती), किल्ले रायगड विकास प्राधिकरण, गडकोट किल्ले संवर्धन आणि विकास समिती, महाराष्ट्र आणि तामिळनाडू राज्य संयुक्त तंजावूर मोडी प्रकल्प, बाजीराव समाधी स्मारक विकास समिती, रावेरखेडी (मध्यप्रदेश), श्री छत्रपती शिवाजी स्मारक समिती, श्रीशैलम, आंध्रप्रदेश.,इतिहास विषयक सल्लागार समिती, महादजी शिंदे स्मारक समिती, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, छत्रपती संभाजी महाराज स्मारक समिती, छत्रपती राजाराम महाराज स्मारक समिती, लाल महाल उत्सव समिती, राष्ट्रीय पानिपत स्मृती समिती, ठाणे मुक्ती दिन उत्सव समिती, संस्कार भारती या संस्था, समितीच्या विविध पदांवर कार्यरत आहेत. भारत इतिहास संशोधक मंडळ आणि पेशवे दफ्तर, पुणे येथील हजारो मोडी कागदपत्रांचा अभ्यास करून त्या आधारे मराठ्यांच्या इतिहासावर त्यांचे अनेक शोधनिबंध प्रसिद्ध केले., पुण्यातील प्राचीन पुण्येश्वर व नारायणेश्वर मंदिरांच्या अवशेषांचा शोध घेऊन ते जगासमोर आणले. तसेच कसबा पेठेत चौथ्या शतकातील प्राचीन विष्णू मुर्तीचा शोध घेऊन ती जगासमोर आणली आणि प्राचीन मानवी वस्तीच्या अवशेषांचा शोध घेऊन ते प्रथम जगासमोर आणले. त्यानंतर डेक्कन कॉलेजच्या माध्यमातून झालेल्या उत्खननामध्ये डॉ.शरद राजगुरू, डॉ.वसंत शिंदे, डॉ.प्रमोद जोगळेकर यांच्याबरोबर भाग घेतला. त्या संशोधनावर आधारित शोधनिबंध प्रसिद्ध झाला. भारतीय सेनेच्या दक्षिण कमांड मुख्यालयात ४० वर्षे सेवा उत्कृष्ट सेवेबद्दल आर्मी कमांडर ऍवॉर्डसह श्री शिवपुण्यस्मृती रायगड पुरस्कार, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज पुरस्कार, जनसेवा पुरस्कार, विश्व हिंदू परिषद धर्मरक्षा पुरस्कार, राष्ट्रवादी काँग्रेस समाजगौरव पुरस्कार, सावरकर स्मृती पुरस्कार असे अनेक प्रतिष्ठेचे पुरस्कार, मान- सन्मान प्राप्त झाले आहेत. त्यांची प्रसिद्ध ग्रंथसंपदा -अठराव्या शतकातील हिंदवी स्वराज्य, स्वराज्यरक्षणाचा लढा, पानिपत - २५० स्मृती ग्रंथ, राजाराम महाराज समाधी इतिहास, ढमढेरे घराण्याचे मराठ्यांच्या इतिहासातील योगदान अशी आहे. बँकेच्या वतीने दि.११ जानेवारी रोजी सहकार भारती स्थापना दिवस ही साजरा करण्यात येईल. या प्रबोधनपर व्याख्यानमालेचा समारोप शुक्रवार, दि.१२ जानेवारी रोजी सुप्रसिद्ध सिनेअभिनेते तथा व्याख्याते राहुल सोलापूरकर (पुणे) यांच्या 'श्रीराम जन्मभूमी - इतिहास राष्ट्र मंदिराचा' या विषयावरील व्याख्यानाने होईल. राहुल सोलापूरकर यांनी त्यांच्या कारकीर्दीची सुरूवात आंतर शालेय नाट्य स्पर्धेतून केली. वक्तृत्व, कथाकथन, अभिनय, व्याख्यान, निवेदन, ध्वनिमुद्रण, संगीत संयोजन, जाहिरात, नाटक, चित्रपट, आकाशवाणी, दूरदर्शन या सर्वच ठिकाणी आपल्या प्रतिभेची चुणूक दाखविली आहे. अनेक शॉर्ट फिल्म, जाहिरातींची निर्मिती केली आहे. ते कायमच सामाजिक कार्यात पुढाकार घेतात. १४ वेगवेगळ्या संस्थांवर ते विश्वस्त म्हणून ही काम पहातात. २०१२-१३ या एकाच वर्षात त्यांनी स्वामी विवेकानंद या विषयावर १०१ व्याख्याने दिली आहेत हे विशेष होय. १०० मराठी चित्रपट, ५ हिंदी चित्रपट, २२ हौशी नाटके, २५ व्यावसायिक नाटके, ३१ टिव्ही सिरीयल्स मधून दमदार अभिनयाची छाप सोडली आहे. सोलापूरकर यांनी साकारलेली राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची भूमिका विशेष गाजली आहे. त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीसाठी त्यांना अनेक प्रतिष्ठेचे पुरस्कार, मान - सन्मान प्राप्त झाले आहेत. १२ जानेवारी रोजी युगपुरूष स्वामी विवेकानंद यांची जयंती बँकेच्या वतीने साजरी येईल. अंबाजोगाई शहर व परिसरातील रसिक, श्रोते, नागरिक, माता, भगिनी आणि युवक वर्गाने सहकुटूंब सहपरिवार उपस्थित राहून युगपुरूष स्वामी विवेकानंद व्याख्यानमाला - २०२४ चा लाभ घ्यावा असे आवाहन बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की, उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख, संचालिका मा.सौ.पंकजाताई गोपीनाथराव मुंडे (पालवे), संचालक श्री.रा.गो.धाट, संचालिका सौ.शरयुताई हेबाळकर, संचालक सर्वश्री विजयकुमार कोपले, चैनसुख जाजु, राजाभाऊ दहिवाळ, इंजि.बिपीन क्षिरसागर, प्राचार्य किशन पवार, मकरंद कुलकर्णी, बाळासाहेब देशपांडे, डॉ.विवेक दंडे, प्रा.अशोक लोमटे, जयकरण सुरेशकांबळे, तज्ज्ञ संचालक अशोक कुलकर्णी, तज्ज्ञ संचालक भिमा ताम्हाणे व मुख्यकार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर तसेच सर्व अधिकारी, शाखाधिकारी, कर्मचारीवृंद यांनी बँकेच्या वतीने प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकाद्वारे केले आहे.

## येळंबघाट येथे राज्य उत्पादन

१४४ बाटल्या, इम्पेरिअल ब्ल्यू व्हिस्कीच्या १८० मिली क्षमतेच्या १९२ बाटल्या, रॉयल स्टंग व्हिस्कीच्या १८० मिली क्षमतेच्या ९६ बाटल्या, रिकाम्या काचेच्या १००० बाटल्या, मॅक्डॉल नंबर १ व्हिस्कीचे १२३६ बुच, इम्पेरिअल ब्ल्यू व्हिस्कीचे १५५० बुच, बी. ७ व्हिस्कीचे १२६५ बुच असा एकूण १०३९०२/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. सदर वेळी आरोपी निलेश कांतराव ढाणे वय वर्ष ३५ रा. येळंबघाट ता.जि.बीड याने त्याच्या अनुज्ञप्तीच्या आवारात गोवा येथील मद्य दुसर्या बाटल्यामध्ये भरून विक्री करण्याच्या उद्देश्याने मिळून आल्याने त्याला अटक करून त्याचे विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ च्या विविध कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच संबंधित अनुज्ञप्ती वर रितसर कारवाई करून विभागीय विसंगती गुन्हा नोंदवून त्याबाबत पुढील कार्यवाही चालू आहे. ही कारवाई अभय अ. औटे, प्र. निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक बीड, व्ही.डी. आगळे उप निरीक्षक, ए.एस. नायबळ उप निरीक्षक, अरुण खाडे उप निरीक्षक व जवान बी.के. पाटील, एस.ए.सांगुळे, एस.व्ही.धस, एन.बी.मोरे, आर.एम.गोणारे, पी.पी.मस्के व .एन.डुकरे यांनी उपरोक्त कार्यवाही यशस्वीरित्या पार पाडली. सदर गुन्ह्याचा पुढील तपास अभय अ. औटे प्र. निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक, बीड हे करीत आहेत.

## जिल्ह्यात दुचाकी चोरींचे

गेले होते. याच संधीचा फायदा उचलून अज्ञात चोरट्याने त्यांची मोटार सायकल व मोबाईल चोरून नेला. परत आल्यानंतर गायकवाड यांना आपली गाडी चोरीला गेल्याचे दिसुन आले. सदरील ही गाडी हिरो एच.एफ डिलक्स या कंपनीची होती. दरम्यान गेल्या काही वर्षापासुन जिल्हाभरात मोटार सायकल चोरट्यांचा धुमाकूळ सुरू आहे. दररोज कुठे ना कुठे चोरीची घडना घडत असल्याचे दिसुन येत आहे. चोरट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी केली जात आहे.

## वेगवेगळ्या अपघातात

समजताच धारुर,आडस येथील महावितरणवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. महेश गिरी यांची कर्तव्यदक्ष कर्मचारी अशी ओळख होती. चौसाळा येथील तरूण विशाल दत्तात्रय घोडके(वय३०) हे नातेवाईकांच्या लग्न कार्यासाठी जात असताना रस्त्यातच मोटारसायकल व ट्रकची समोरासमोर धडक होऊन विशाल घोडके हे जागीच ठार झाले. विशाल घोडके याच्या पश्चात आई वडील,पत्नी,एक मुलगा,एक मुलगी असा परिवार असून या अपघाती निधनामुळे चौसाळा परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून ट्रक चालकाविरूध्द पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व

विद्यार्थी जीवनात व्यक्तिमत्त्वाचा विकास करायचा असेल तर सर्वप्रथम निर्व्यसनी व कठोर परिश्रम करण्याची जिद्द,नीटनेटकेपणा, भाषाप्रभुत्व व संगणकीय असण्याचीही तितकीच काळाची गरज आहे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा.बालाजी बोडके यांनी केले.सूत्रसंचालन डॉ गणेश मोकासरे यांनी केले तर आभार डॉ. शज्ञानेश्वर शिंदेयांनी मानले.कार्यक्रमासाठी अभिजित सुरवसे,सखाराम धोत्रे यांनी परिश्रम घेतले.यावेळी प्राध्यापक, कर्मचारी,विद्यार्थी,विद्यार्थिनी उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# मराठा आंदोलकांनी परभणीत भारत संकल्प यात्रेचा रथ रोखला; सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी

**परभणी । वृत्तसंस्था**

परभणीत विकसित भारत संकल्प यात्रेला होणार विरोध कायम असल्याचे पाहायला मिळत आहे. पूर्णेतील लिमला गावातील मराठा बांधवांनी विकसित भारत यात्रेच्या रथाला विरोध केला आहे. सोबतच यावेळी सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी देखील करण्यात आली. मराठा आरक्षण मिळेपर्यंत ना योजना, ना प्रचार करू देणार असल्याची भूमिका यावेळी मराठा आंदोलकांनी व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे गावकऱ्यांचा होणारा विरोध पाहता विकसित भारत संकल्प यात्रेसाठी आलेल्या अधिकाऱ्यांनी काढता पाय घेत गावातून माघार घेतली. परभणी जिल्ह्यात केंद्र सरकारच्या विकसित भारत संकल्प यात्रेला विरोध




कायम असून, परभणीच्या पुर्णा तालुक्यातील लिमला येथील गावकऱ्यांनी आज या यात्रेचा रथ शाळेसमोर रोखला. जोपर्यंत मराठा आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत गावात ना सरकारच्या योजनांचा प्रचार करू देणार, ना निवडणूक होऊ देणार असा निर्धार या गावकऱ्यांनी केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत हा विकसित भारत संकल्प यात्रेचा रथ परतावून लावलाय. यावेळी मोठ्या संख्येने गावकरी या आंदोलनात सहभागी झाले होते.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी पुर्णा तालुक्यातील लिमला गावात तब्बल १०० दिवसांपासून साखळी उपोषण करण्यात येत आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळेपर्यंत हे उपोषण असेच सुरु असणार असल्याची भूमिका गावकऱ्यांनी घेतली आहे. गावातील सर्वच धर्मातील लोकं या उपोषणाला पाठींबा देत असल्याचा दावा आंदोलकांनी केला आहे. असे असतांना आज याच गावात केंद्र सरकारच्या विकसित भारत संकल्प यात्रा पोहचली होती. मात्र, आरक्षणाचा मुद्दा मार्गी लागत नाही तोपर्यंत गावात कोणतेही शासकीय कार्यक्रम होऊ देणार नसल्याची भूमिका गावकऱ्यांनी घेतली आहे. लिमला गावात आज विकसित भारत संकल्प यात्रा पोहचताच सकल मराठा समाजाच्या वतीने त्याला विरोध झाला. यावेळी गावातील महिला-पुरुष सर्वच एकत्र आले आणि त्यांनी याला विरोध केला. विशेष म्हणजे गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या समोरच हा कार्यक्रम होणार होता. त्यामुळे शाळेतील मुलं देखील आपल्या पालकांच्या आंदोलनात सहभागी झाले. त्यांनी देखील जोरदार घोषणाबाजी केली. गावकऱ्यांचा होणारा हा संपर्ण विरोध पाहता संबंधित शासकीय अधिकाऱ्यांनी देखील आपला कार्यक्रम रद्द करत गावातून काढता पाय घेतला.

## दोन बोगस डॉक्टरांना अटक; अपर पोलिस अधीक्षकांच्या पथकाची कारवाई

**छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था**

गंगा ढाब्याजवळ एका घरात दोन बोगस डॉक्टरांना औषधोपचार व रूग्णांची तपासणी करताना रंगेहात पकडून अटक करण्यात आली. ही कारवाई शनिवारी ६ जानेवारी रोजी दुपारी बारा वाजताच्या सुमारास करण्यात आली. अपर पोलिस अधीक्षकांच्या पथकाने पाळत ठेऊन ही कारबाई केली.या प्रकरणी त्या डॉक्टर विरोधात शिवाजी नगर पोलिसात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करून रोख आणि मुद्देमाल असा एकूण ४९ हजार ६०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या संदर्भात प्राप्त माहिती नुसार सजनपुरी भागातील गंगा ढाब्याजवळ सय्यद सादिक सय्यद गफार यांच्या मालकीच्या घरात दोन जण लोकांना विविध आजारांवर गोळ्या व औषधी देत आहेत. तसेच कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यकीय पदवी नसताना औषधोपचार आणि रूग्ण तपासणी करीत असल्याची माहिती अपर पोलिस अधीक्षक यांना मिळाली होती. या माहितीची खात्री पटल्यानंतर दोन्ही आरोपी बोगस डॉक्टर विरोधात अपर पोलिस अधीक्षक यांच्या पथकाने सापळा रचला. दरम्यान शनिवारी धाड टाकली असता वीरेंद्र सुरजितसिंग रा. हरियाणा व सय्यद सिकंदर सय्यद अफसर वय २३ रा, देऊळघाट तालुका जिल्हा बुलडाणा हे दोघे रूग्णांना विविध औषधी देताना आढळून आले. या वेळी त्यांच्या ताब्यातून विविध प्रकारची द्रव आणि भुकटी स्वरूपातील ४९ हजार ६०० रूपयांची औषधी तसेच बिहूसिंग महेंद्रसिंग या नावाचे पॅरामेडिकल कौन्सलिंग पंजाबचा डिप्लोमा सर्टिफिकेट ब इतर सर्टिफिकेट, कागदपत्रे, रोख व मोबाइल असा, एकूण ४९ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी दोन्ही आरोपी विरुद्ध येथील सामान्य रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत बानखडे यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय पंकज सपकाळे, पोहेका प्रदीप मोठे, पोका अमर ठाकूर यांनी केली आहे. पुढील तपास एपीआय समाधान रिठे हे करीत आहेत.

## चाकूने भोसकून युवकाचा खून

**जालना । वृत्तसंस्था**

चाकूने भोसकून युवकाचा खून करण्यात आल्याचा प्रकार जालना तालुक्यातील पीरपिंपळगाव येथे घडला. दीपक हरिभाऊ कोल्हे असे या घटनेतील मृत युवकाचे नाव आहे. जिल्ह्यात चार दिवसांतील ही तिसरी घटना आहे. यापूर्वी चार दिवसांपूर्वी शहरातील सिंधी बाजार येथे चायनीज चालकास भोसकून जखमी करण्यात आले होते, तर अंबड येथे शुक्रवारी एका युवकाचा खून करण्यात आला होता. दीपक हरिभाऊ कोल्हे (२८) याचे त्याच्या नातेवाइकाशी फोनवरुन वाद झाला. त्यातून आरोपी याने शनिवारी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास दीपक यास पीरपिंपळगाव येथे चाकूने वार केले. यात दीपक गंभीर जखमी झाला. त्यास त्याच्या नातेवाइकांनी शहरातील खासगी रुगणालयात उपचारासाठी दाखल केले, परंतु डॉक्टरांनी त्यास तपासून मृत घोषित केले. घटनेनंतर चंदनझिरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. याप्रकरणी रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. दरम्यान, डिसेंबर महिन्यात गजानन तौर यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली आहे. या घटनेने संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे. यानंतर नवीन वर्षातही खुनाच्या घटना सुरू आहेत पैसे देण्यावरून झाला वाद मृत व त्याच्या नातेवाईकाने हॉटेलमध्ये दोन ठिकाणी जेवण करून मद्यप्राशन केले. त्यानंतर दोघांत पैसे देण्यावरून वाद झाला. यामध्ये दीपक कोल्हे याचा मृत्यू झाला.

## संभाजीनगरात रस्ते काम अपूर्ण

**संभाजीनगर । वृत्तसंस्था**

छत्रपती संभाजी नगर ते जळगाव हा मार्ग गुजरात,मध्यप्रदेशसह इतर राज्यांना जोडणारा प्रमुख मार्गआहे. राज्य महामार्ग क्रमांक ८ हा सामाजिक बांधकामविभागाकडून केंद्रीय रस्ते विकास महामंडळाकडेहस्तांतरित केल्यानंतर, या रस्त्याला राष्ट्रीयमहामार्गाचा दर्जा मिळाला. त्यामुळे या रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम नऊ वर्षांपुर्वी सुरु झाले. एवढामोठा कालावधी उलटूनही या मार्गाचे कामठिकठिकाणी अपूर्ण आहे. छत्रपती संभाजीनगर तेअजिंठा लेणी या १०९ किमी अंतरात, सात पुलांचे वसहा ठिकाणी रस्त्याचे काम अपूर्ण आहे. छत्रपती संभाजीनगर जळगाव राज्यमार्ग हा महामार्गविभाकडे हस्तांतरीत झाल्यानंतर, त्याची दशा बदलेलअशी अपेक्षा होती. मात्र गेल्या नऊ वर्षांत रखडलेल्या कामांमुळे अपघात वाढले आहेत. राष्ट्रीय महामार्गाचादर्जा मिळाल्यानंतर, दळण वळणाची सुविधा वाढेल,अशी अपेक्षा होती. परंतु आधीच्या कंपनीने कामसोडल्याने हे काम दीर्घकाळ रखडले होते. त्यानंतरआर.के.सी. कंन्स्ट्रक्शन या कंपनीने हे काम घेतले.रस्त्याचे काम चालू झाले, अनेक ठिकाणी पूर्णहीझाले, मात्र काही ठिकाणी पूल आणि रस्त्याचे कामखोळंबले आहे. त्यामुळे संभाजीनगर-जळगावरस्त्यावरील वाहनधारकांची गैरसोय कायम आहे. काँक्रिटीकरणासाठी छत्रपतीसंभाजी नगर - सिल्लोड (६०किमी), सिल्लोड ते अजिंठा(४० किमी) आणि अजिंठा तेजळगाव (४७किमी) हे टप्पेपाडले. रस्त्याचे कंत्राट आंध्रप्रदेशच्या लँडप्रो ऋत्विककंन्स्ट्रक्शनने घेतले होते. हीकंपनी आर्थिकदृष्ट्याअडचणीत आली आणिरस्त्याचे काम बंद पडले. तोपर्यंतरस्त्याचे ३० टक्के काम पूर्णझाले होते. फुलंब्री तालुका : चौका घाटातपुलाचे व रस्त्याचे, बिल्डा फाटापाटीजवळील पूल, आडनदीवरील पूल, महाल किन्होळायेथील पूल व पाचशे मीटर रस्ता. सिल्लोड तालुका : केऱ्हाळाफाट्यासमोरील पूल, चिंचखेडातत पूर्णा नदीवरील पूल व ३००मीटर रस्ता, सिल्लोड शहर,डोंगरगाव फाटा ५ किमी रस्त्याचेकाम, पालोद गावाजवळ पूल,(गोल टेक) बाळापूर फाटा रस्ता,अजिंठा गावाजवळ पूल व रस्ता.

## सरकारच्या कुठल्याही कामात हस्तक्षेप करायचा नाही -गडकरी

**नागपूर । वृत्तसंस्था**

सरकार विषकन्येसारखे आहे. जिथे सरकारची मदत मिळते तिथे तो प्रयोग बंद पडतो. म्हणून मी कुठल्याही सरकारची मदत घेत नाही असे विधान केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले आहे. भंडाऱ्यातील पवनी येथील ग्रामीण विकास संस्थेच्या वतीनेआनंद विद्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळेस त्यांनी वनाधिकाऱ्यांविषयी बोलतांना उद्विग्न प्रतिक्रिया दिली आहे. भंडारा ते पवनी हा रस्ता निधी मंजूर झालेला असताना केवळ वनविभागाच्या जाचक अटींमुळे गेल्या १२ वर्षांपासून बंद पडला आहे. या कारणास्तव वनाधिकाऱ्यांसोबत अनेकदा मीटिंग घेतल्या, मात्र तरीही काम पूर्म होत नसल्याचे नितीन गडकरी यावेळी म्हणाले. यावेळी नितीन गडकरी म्हणाले की, सरकारच्या कुठल्याही कामात हस्तक्षेप करायचा नाही, मदतही घ्यायची नाही. मी नेहमी गमतीने म्हणतो की, सरकार विषकन्येसारखं आहे. जिथे सरकारची मदत मिळते तिथे तो प्रयोग बंद पडतो. म्हणून मी कुठल्याही सरकारची मदत घेत नाही, सरकारच्या अधिकाऱ्यांकडे जात नाही. अधिकाऱ्यांना गळ घालता घालता डोक्यावरचे केस उडून जातात, अशी टिपण्णी नितीन गडकरी यांनी केली आहे. यावेळी पुढे बोलतांना भंडारा ते पवनी या रस्त्याचं बांधकाम अनेक प्रयत्नांनंतरही थांबलेले असल्याने गडकरी यांनी भंडाऱ्याचे कलेक्टर



आणि एसपींना भाषणादरम्यान विनंती करून आपण वैतागलो असल्याची उद्विग्न प्रतिक्रिया व्यक्त केली. यावेळी त्यांनी जिल्हा पोलिस अधीक्षकांना उद्देशून 'नवीन कुठलं कलम असल्यास ते लावा आणि या रस्त्यामध्ये आडकाठी घालणाऱ्या नतद्रष्ट फॉरेस्ट अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करून त्यांना अटक करा' असे विधान त्यांनी केले आहे. पुढे बोलतांना नितीन गडकरी म्हणाले की, समाजात कोणता धर्म नाही आणि जाती नाही. गरिबाला जात, पंथ, धर्म आणि जाती नसते, त्यामुळे मानवतेच्या आधारावर विचार केला पाहिजे. महिला, पुरुष, कामगार आणि शेतकरी अशा चारच जाती आहेत. माणूस हा जातीने नाही तर गुणाने मोठा आहे. या समाजातील अस्पृश्यता, जातीयता नष्ट झाली पाहिजे आणि मानवतेच्या सिद्धांताच्या आधारावर माणसाचे कल्याण झाले पाहिजे, असे मत नितीन गडकरी यांनी व्यक्त केले.

## गतिमंद मुलीवर शेतात अत्याचार

**जळगाव । वृत्तसंस्था**

भीक मागून उदरनिर्वाह करणाऱ्या एका १३ वर्षीय अल्पवयीन मतीमंद मुलीला शेतात नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघड झाली असून या प्रकरणी वसीम खान कय्युब खान (२५, रा.ममुराबाद, ता. जळगाव) याला अटक करण्यात आली. त्याला न्यायालयाने तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. सुभाष चौक परिसरातील मंदिराजवळ १३ वर्षीय मतीमंद मुलगी तिच्या नातेवाईकांसोबत शुक्रवार, ५ जानेवारी रोजी भिक मागत असताना वसीम खान कय्युब खान याने या मुलीला बोलावून दुचाकीवर (क्र. एमएच १९ ईएच ५४३१) बसविले. त्यानंतर तिला तो जळगाव-भुसावळ मार्गावरील दूरदर्शन टॉवरजवळील एका शेतात घेऊन गेला व तेथे तिच्यावर अत्याचार केला. हा प्रकार पीडीत मुलीने नातेवाईकांना सांगितला. त्या वेळी त्यांनी शनिपेठ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. ही मुलगी गायब झाल्याने सुरुवातीला या मुलीच्या अपहरणाचा गुन्हा दाखल होता.

## हिंगोलीत मराठा आरक्षणासाठी पुन्हा तरूणाची आत्महत्या

**हिंगोली । वृत्तसंस्था**

कळमनुरी तालुक्यातील शेवाळा येथे एका तरुणाने मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी विषारी औषध पिऊन आत्महत्या केल्याची घटना रविवारी ता. ७ सकाळी घडली आहे. त्यांच्या खिशात चिठ्ठी सापडली असून त्यामध्ये मराठा आरक्षणासाठी जीव देत असल्याचे नमूद केले आहे. हिंगोली जिल्ह्यातील आरक्षणाच्या मागणीसाठी ही अकरावी आत्महत्या आहे. कळमनुरी तालुक्यातील शेवाळा येथील वाघमारे (४२) हा तरुण मराठा आरक्षणाच्या आंदोलनामध्ये सक्रिय होता. समाजाला आरक्षण मिळत नसल्याने मागील काही दिवसापासून तो अस्वस्थ होता. दरम्यान आज सकाळी त्याचे मुलं शिकवणी वर्गासाठी गेले होते. पत्नी बाहेर असताना संतोष याने विषारी औषध पिले. काही वेळानंतर त्याची पत्नी घरी आल्यानंतर त्यांना हा प्रकार लक्षात आला. त्यांनी तातडीने आरडाओरड करून शेजाऱ्यांना बोलावले. त्यानंतर उपचारासाठी आखाडा बाळापूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केल्यानंतर संतोष याचा मृत्यू झाल्याची जाहीर



केले. घटनास्थळी सहाय्यक पोलिस निरीक्षक सुनील गोपीनवार, उपनिरीक्षक शिवाजी बोंडले, जमादार राजू जाधव, पंढरी चव्हाण, पोलिस पाटील स्वप्निल गांजरे यांच्या पथकाने भेट दिली. मयत संतोष याच्या खिशामध्ये चिठ्ठी सापडली असून मराठा आरक्षणासाठी जीव देत असल्याचे त्यात नमूद केले आहे.दरम्यान मयत संतोष यांच्या पश्चात पत्नी दोन मुली एक मुलगा असा परिवार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

# मराठा आरक्षण, शेतकऱ्यांसाठी राजे श्रीमंत छत्रपती शाहू महाराज सदैव रस्त्यावर उतरतात

**सांगली । वृत्तसंस्था**

करवीर नगरीचे भाग्यविधाते, आरक्षणाचे जनक आणि समतेचा पाया बुलंद करणारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या गादीचे आणि हिंदवी स्वराज्याचे संस्थापक युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गादीचे थेट वारसदार कोल्हापूरचे राजे श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांचा आज (७ जानेवारी) ७६वा वाढदिवस. युगपुरुषांच्या गादीचा वारसा खांद्यावर असतानाही शाहू महाराज समर्थपणे सांभाळत आले आहेत. गर्भश्रीमंत राजेशाही असताना कोणतंही राजेपण न मिरवता लोकांमध्ये मिसळणारा राजा अशी बिरुदावली त्यांनी आजवर कमावली आहे, हीच शाहू महाराजांच्या आजवरच्या कार्याची पोहोचपावती आहे. श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांचा अमृतमहोत्सवी वाढदिवस गेल्यावर्षी दिमाखात साजरा करण्यात आला. शाहू विचारांवर प्रेम करणारा राज्यभरातून जनसागर खासबाग मैदानात लोटला होता. कोल्हापूर नगरीने शाहू महाराजांचा वारसा अभिमानाने जपताना राज्याला नव्हे, तर संपूर्ण देशाला पुरोगामी विचारांची दिशा दिली आहे. जे या करवीर नगरीत घडतं त्याचा संदेश देशपातळीवर दिला जातो, असा कोल्हापूरी विचारांचा पुरोगामी बाणा आहे. मात्र, त्याच विचाराला प्रतिगामी शक्तींकडून जाणीवपूर्वक बोट लावण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे २०२३ या सरत्या वर्षात सातत्याने दिसून आले. मात्र, राजर्षी शाहूंच्या विचारांचा आणि कृतीचा वारसदार असलेल्या श्रीमंत शाहू महाराज छत्रपती यांनी थेट रस्त्यावर उतरून प्रतिगामी शक्तींना वेळीच जागा दाखवून दिली आहे. राज्यात २०२३



मध्ये अनेक ठिकाणी दंगलीचे प्रसंग घडले. राज्यातील अनेक जिल्ह्यात जातीय आणि धार्मिक दुफळी निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. यामध्ये कोल्हापूर सुद्धा मागे राहिले. ज्या शिवाजी महाराज आणि छत्रपती शाहूंच्या पदस्पर्शाने आणि कृतीने पावन झाला त्या कोल्हापूरला सुद्धा शिवराज्यभिषेक दिनी दंगलीचा डाग लागला. यानंतर पोलिसांच्या भूमिकेवर शाहू महाराज यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित करून वाचा फोडली होती. शाहू महाराज यांनी गेल्यावर्षी शिवछत्रपतींचा ३४९ वा शिवराज्याभिषेक सोहळा यंदा कोल्हापुरात नवीन राजवाड्यावर मोठ्या दिमाखात साजरा केला. पहिल्यांदाच शिवराज्याभिषेक कोल्हापुरात साजरा करण्यात आला. कोल्हापुरात गेल्यावर्षी ७ जून रोजी झालेल्या धार्मिक दंगलीनंतर पुन्हा एकोपा नांदण्यासाठी राजर्षी शाहू सलोखा मंचकडून शाहू सद्भावना रॅली आणि सभेचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत स्वत: शाहू महाराज रस्त्यावर उतरले. गेल्या १०० वर्षात कोल्हापूरला डाग लागला नाही तो ७ जून रोजी लागल्याची खंत त्यांनी व्यक्त करताना प्रतिगामी शक्तींना खडे बोल सुनावले. कोल्हापूर टार्गेट केल आहे. मात्र, ते टार्गेट त्यांच्यासाठी कठीण आहे, कोल्हापूरला कोणतीही गोळी लागणार नाही, असा निर्धार शाहू महाराजांनी शिव शाहू सद्भावना रॅलीनंतर झालेल्या सभेत बोलून दाखवला होता. यानंतर कोल्हापुरातील वातावरण निवळले होते. कोल्हापूरला दंगलीचा डाग लागल्यानंतर सातत्याने सामाजिक उपक्रमात हिरारीने महाराजांनी रस्त्यावर उतरून सहभाग नोंदवला आहे. सामाजिक एकोपा टिकवण्यासाठी खडेबोल सुद्धा सुनावले आहेत. लोकराजा शाहू महाराजांच्या जयंतीदिनी रिक्षातून प्रवास करत साधेपणा दाखवून दिला होता.

### मराठा आंदोलनाला पाठिंबा

मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आंदोलनासाठी रान पेटवल्यानंतर शाहू महाराज यांनी थेट आंतरवाली सराटीत जाऊन त्यांची भेट घेतली होती. सरकारला शब्द मानावाच लागेल, याचीही आठवण त्यांनी जरांगेच्या व्यासपीठावरून करून दिली होती. यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी कोल्हापूर दौरा केल्यानंतर महाराज व्यासपीठावर उपस्थित होते. शाहू महाराजांनी राष्ट्रवादी फुटल्यानंतर शरद पवारांच्या सभेचे अध्यक्षपद सुद्धा स्वीकारले होते. कोल्हापुरात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी गेल्यावर्षी प्रखर आंदोलन करताना महामार्ग रोखून धरला होता. त्यावेळी कोणाच्या ध्यानीमनी नसताना महाराज भर उन्हात थेट हायवेवर पोहोचून राजू शेट्टी यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला होता. साखरसम्राट राजू शेट्टींच्या विरोधात असतानाही महाराजांनी शेतकऱ्यांची बाजू लावून धरताना राजू शेट्टी यांनी केलेल्या आंदोलनाला महाराजांनी बळ दिले होते. ज्येष्ठ पत्रकार विजय चोरमारे यांनीही शाहू महाराजांच्या वाढदिनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. ते म्हणतात, कोल्हापूरच्या गादीचा वारसा सांभाळणे ही सोपी गोष्ट नाही. पुरोगामी महाराष्ट्राची राजधानी म्हणून कोल्हापूरची ओळख टिकवून ठेवण्यासाठी इथल्या अनेक माणसांनी खडतर संघर्ष केला. भाई माधवराव बागलांपासून संतराम पाटील, प्रा. एन डी पाटील, गोविंदराव पानसरे, बाबुराव धारवाडे, रवींद्र सबनीस, चंद्रकांत यादव, विष्णूपंत इंगवले ही काही प्रमुख नावे. याव्यतिरिक्त दुसऱ्या तिसऱ्या फळीतील शेकडो कार्यकर्त्यांनी कोल्हापूरचा हा पुरोगामी वारसा टिकवून ठेवला. गेल्या तीनेक दशकात त्याला खंबीर साथ लाभली आहे ती कोल्हापूरच्या श्रीमंत शाहू छत्रपती महाराजांची. राजर्षी शाहू महाराजांचे गादीचे वारसदारच नव्हे, तर शाहूविचारांचे कृतीशील वारसदार म्हणून महाराजांनी आपली ओळख निर्माण केली.

# दुष्काळसदृश परिस्थितीच्या नियोजनासह आगामी वर्षात वाढीव खर्चाचे नियोजन करण्याचे सर्व यंत्रणांना निर्देश -मुंडे

**बीड । प्रतिनिधी**

देशाचे पंतप्रधान यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रीय कृषी विभागाने 'फार्मर आयडी' हा पायलट प्रोजेक्ट हाती घेतला असून, यांतर्गत बीड जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे. फार्मर आयडी अंतर्गत शेतकऱ्यांची नोंद केल्यानंतर शेतकऱ्यांना केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना, पीक कर्ज आदी बाबींसाठी वारंवार अर्ज प्रक्रिया करणे, चकरा मारणे यातून कायमची मुक्तता मिळणार असून, ही बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत आनंदाची बातमी असल्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली सन २०२४-२५ सालच्या बीड जिल्हा नियोजन समितीच्या प्रारूप आराखड्याचे नियोजन करण्यासंदर्भात जिल्हा नियोजन समितीची बैठक अयोजिय करण्यात आली होती. या बैठकीस आ.संदीप क्षीरसागर, आ.सुरेश अण्णा धस, आ.बाळासाहेब आजबे , अविनाश नाईकवाडे यांसह आदी उपस्थित होते. या बैठकीनंतर धनंजय मुंडे यांनी पत्रकारांशी संवाद साधला.



बीड जिल्ह्यात सध्या दुष्काळ सदृश परिस्थिती असून आगामी काळात पिण्याच्या पाण्यासाठी टँकर्स, जनावरांसाठी पाणी व चारा अशी अनेक आव्हाने समोर येणार असून, २०२४ सालचा आराखडा तयार करताना या बाबींच्या वाढीव खर्चाचे नियोजन होणे आवश्यक असून, तसे नियोजन करण्याचे निर्देश धनंजय मुंडे यांनी प्रशासकीय यंत्रणांना दिले आहेत. उसाचे क्षेत्र कमी असल्याने स्थलांतरित ऊसतोड मजूर जिल्ह्यात परतल्यानंतर त्यांना रोजगार हमीतून काम, अन्न-धान्य आदी सर्व मिळण्यासाठी विशेष नियोजन करणे तसेच गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार ही योजना अधिक प्रभावीपणे राबविणे हेदेखील आगामी काळात फायदेशीर ठरणार असुन, त्याचाही समावेश आराखड्यात करावा, असे धनंजय मुंडे यांनी सुचवले. आगामी आर्थिक वर्षात बीड व परळी वैद्यनाथ येथे महिला बचत गटांच्या उत्पादनांना विक्रीसाठी मॉल व बचत भवन एकत्रित उभे करण्यासाठी जागेसह निधीचे नियोजन आगामी आराखड्यात करण्याचेही निर्देश धनंजय मुंडे यांनी दिले. चालू आर्थिक वर्षातील निधी १००% वेळेत खर्च करून पुढील आर्थिक वर्षात मागणी करण्याच्या दृष्टीने सर्व विभागांनी तातडीने कार्यवाही पूर्ण करण्याच्या सूचनाही धनंजय मुंडे यांनी संबंधितांना दिल्या. यावेळी चालू आर्थिक वर्षातील खर्च झालेल्या व उर्वरित निधीचा आढावाही त्यांनी घेतला. येत्या १० जानेवारीच्या आत जे विभाग खर्चाची उद्दिष्ट पुर्ती करतील, त्यांना आगामी काळात अधिकचा निधी मिळवून दिला जाईल, असेही धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले. या बैठकीत खा.प्रितमताई मुंडे यांनी विविध विका ▶▶ पान २ वर

## गॅलरीतून पडल्याने ९ वर्षीय मुलाचा मृत्यू

**बीड । प्रतिनिधी**

पतंग काढत असतांना गॅलरीतून खाली पडल्याने एका ९ वर्षीय चिमुकल्याचा दुर्देवी मृत्यु झाल्याची घटना काल सायंकाळच्या दरम्यान शहरातील पांगरी रोड परिसरात घडली. या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. कृष्णा दिलीप तकीक यांचा मुलगा काल सायंकाळच्या दरम्यान आपल्या घराच्या गच्चीवर पतंग उडवत होता. त्याचा पतंग आडकल्याने तो काढण्याचा प्रयत्न करत होता. पतंग काढत असतांना तोल जावून तो गॅलरीतून खाली पडला. यामध्ये त्याला गंभीर मार लागून तो गतप्राण झाला. या मुलांवर रात्री उमरद जहॉगिर येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेने उमरद जहॉगिर व खापर पांगरी येथे हळहळ व्यक्त केली जात आहे.

## बेकायदेशीर बांधकामांवर नगर पालिका कधी हातोडा चालवणार

**बीड । प्रतिनीधी**

बीड शहरातील अगदी मध्यस्थानी असणाऱ्या चाणक्यपुरी सारख्या उच्चभ्रु वसाहतीमध्ये नियम धाब्यावर ठेवून बांधकाम परवाना प्रमाणे बांधकाम न करता कसलाही एफएसआय न सोडता सर्व नियम मोडून अपार्टमेंटचे बांधकाम चालू करण्यात आले आहे, याची वारंवार तक्रार करुन देखील बांधकाम थांबवले जात नाही. अवैध बांधकाम पाडले जात नाही. बीड नगरपरिषद मध्ये वारंवार तक्रारी अर्ज देऊन देखील कसलेही प्रकारची दखल न घेता मुख्याधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने चाणक्यपुरीतील एकमेव अपार्टमेंटचे बांधकाम बेकायदेशीर पणे हे चालू आहे, या बेकायदेशीर बांधकामाला कोणाचा आशीर्वाद आहे हे समजत नाही. कसल्याही प्रकारचा एफएसआय किंवा साईडने जागा न सोडता अगदी उच्चभ्रू वसाहतीमध्ये तंतोतंत बांधकाम करून सर्व नियमांना मोडून बांधकाम करण्याचे नियोजन चालू आहे. सदरच्या अपार्टमेंटचे नंतर सर्वसामान्यांना विक्री करून त्यांचे जीवन धोक्यात घालण्याचे मोठे पाप या अपार्टमेंटचे मालक करत आहेत. या इल्लीगल बांधकाम तात्काळ थांबून नियमाप्रमाणे बांधकाम न झालेले बांधकाम तात्काळ पाडण्यात यावे, तसेच अपार्टमेन्ट चे मालक देशपांडे व त्यांचे पार्टनर यांच्यावरती अवैध बांधकामाचा गुन्हा दाखल होण्याची मागणी वसाहतीच्या रहीवाश्याकडुन होत आहे.

## खाजगी रिक्षांवर कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर आणि आरटीओ यांच्या आदेशानुसार बीड शहरात चालणार्या रिक्षा व खाजगी रिक्षांवर कारवाई मोहीम सुरू करण्यात आली. या मोहिमेअंतर्गत सुरू केलेल्या कारवाईत पहिल्याच दिवशी १२ स्क्रॅप व १६ खाजगी रिक्षा पकडण्यात आल्या. या कारवाई मध्ये अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मुदीराज यांच्या निर्देशानुसार पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, एपीआय घुगे, पोलीस उपनिरीक्षक सय्यद, मिसाळ, पोलीस हवालदार गरजे, नागरगोजे, भूतके, नारायण




दराडे, पोलीस उपनिरीक्षक राख, चालक राम पवार, वाघमारे, मोटार वाहन निरीक्षक रणजीत पाटील, राहुल माने, गणेश विघ्ने, श्रीमती कल्याणी मंडलिक, सहा. मोटार वाहन निरीक्षक, नितीन वक्ते, वाहन चालक उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड यांचा या कारवाईमध्ये सहभाग होता.

## छत्रपती साखर कारखान्याचे चेअरमन जगतापांच्या कन्येच्या विवाह सोहळ्यास उध्दव ठाकरेंची उपस्थिती

**माजलगाव । प्रतिनिधी**

भाजपाचे माजलगाव विधानसभा निवडणुक प्रमुख मोहनराव जगताप यांच्या कन्येचा विवाह छत्रपती संभाजी नगर येथील हॉटेल अजंता आंबेशटर येथे झालेल्या शाही विवाहास राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे सह केंद्रीयमंत्री रावसाहेब दानवे, भागवत कराड ,संजय राऊत, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, अतुल सावे सह खा.प्रितम मुंडे यांच्या सह अन्य मान्यवरांची उपस्थिती होती. माजलगाव येथील माजी आ.बाजीराव जगताप, यांची नात भाजपाचे माजलगाव विधानसभा निवडणुक प्रमुख मोहनराव जगताप यांची कन्या पुनम हिचा विवाह डॉ.दिपक शिंदे यांच्या सोबत दि५रोजी मोठ्या थाटामाटात छत्रपती संभाजी नगर येथील हॉटेल अजंता ▶▶ पान २ वर



## विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व बहुआयामी असावे -डॉ.वाघ

**माजलगाव । प्रतिनिधी**

बहिर्गत व्यक्तिमत्वापेक्षा अंतर्गत व्यक्तिमत्व महत्त्वाचे असून विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी, सातत्य, चौकस आणि कठोर परिश्रमाची सवय लावली. यासाठी विद्यार्थ्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्व असावे असे मत डॉ. आनंद वाघ यांनी सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील आजीवन विस्तार विभागाच्या कार्यशाळेत बोलताना व्यक्त केले. सुंदरराव सोळंके महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार विभाग आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवशीय विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते.कार्यशाळेचे उद्धाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे संचालक डॉ.आनंद वाघ यांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ. एम.ए.कव्हळे होते.यावेळी उपप्राचार्य डॉ.एन.के.मुळे, कार्यक्रमाधिकारी प्रा.बालाजी बोडके,डॉ.ज्ञानेश्वर शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.पुढे बोलताना डॉ.आनंद वाघ म्हणाले की,एखादे अपयश आले तर खचून न जाता ते अपयश हेच यशाची पायरी समजून पुन्हा जोमाने तयारीला लागल्यास यशस्वी झाल्याशिवाय राहत नाही. यावेळी अध्यक्षीय समारोपात करताना डॉ.एम.ए.कव्हळे म्हणाले की,विद्यार्थ्यांनी ▶▶ पान २ वर

## ११ लाखांची फसवणूक;सात जणांविरोधात गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**

ऊसतोडणीसाठी मजुर पुरवितोत असं म्हणुन एका गाडी चालकांकडून ११ लाख ६६ हजार रूपये घेण्यात आले होते. पैसे घेवूनही मजुरांचा पुरवठा करण्यात आला नाही. उलट चालकांस शिवीगाळ करून धमकविण्यात आले आहे. या प्रकरणी ७ आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. अशोक बाळाभाऊ शेंडगे (रा.नाळवंडी नाका



राजु नगर बीड) यांच्यासोबत अजित किशन पवार व इतरांनी मजुर पुरविण्यासाठी शेंडगे यांच्याकडून ११ लाख ६६ हजार रूपये घेण्यात आले होते. पैसे घेवूनही त्यांना मजुर पुरविण्यात आले नाही. शेंडगे यांनी पैशाची मागणी केली असता त्यांना अजय किसन पवार व गजानन किसन पवार या दोघांनी शिवीगाळ केली. या प्रकरणी अशोक शेंडगे यांच्या फिर्यादीवरून आरोपी अजय पवार, गजानन पवार, देवा पवार, सचिन पवार, किसन पवार, त्रीशला पवार, अभिषेक रेडे (रा. मिलिंद नगर, नेहकर जि. बुलढाणा) यांच्या विरोधात पेठ बीड पोलिस ठाण्यात कलम ४२०, ५०४, ३४ भादंवी नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## दीनदयाळ बँकेत व्याख्यान माला -चेअरमन ॲड.पत्की

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

विश्वास, विकास आणि विनम्रता या त्रिसुत्रीने आर्थिक क्षेत्रात कार्यरत दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही १० जानेवारी ते १२ जानेवारी २०२४ या कालावधीत तीनही दिवस दररोज सायंकाळी ६.३० वाजता युगपुरूष स्वामी विवेकानंद यांच्या १६१ व्या जयंतीनिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी अंबाजोगाईकरांनी व बँकेच्या सर्व सभासदांनी नियोजित वेळेत उपस्थित राहून व्याख्यानमालेचा सहकुटूंब, सहपरिवार लाभ घ्यावा असे नम्र आवाहन बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की व उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे. याबाबत बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की व उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख यांनी सांगितले की, दीनदयाळ बँकेने ३१ डिसेंबर २०२३ अखेरपर्यंत ५०० कोटींच्या ठेवींचा टप्पा पूर्ण करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले होते. या वर्षीच्या दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर एक परिवार म्हणून काम करताना उत्तम टीमवर्क करून नुकताच ५०३ कोटींच्या ठेवींचा टप्पा पूर्ण केला आहे. एकूण व्यवसायाचा ८२५ कोटींचा पल्ला ही गाठला आहे. लवकरच ३१ मार्च २०२४ अखेरपर्यंत १००० कोटी रूपयांच्या व्यवसायाचे लक्ष बँकेने समोर ठेवले आहे. लवकरच ते ही साध्य होईल. आर्थिक क्षेत्रात कार्य करीत असताना सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून समाजाचे आपण काही देणे लागतो. याच जाणिवेने अंबाजोगाईकरांना मागील २१ वर्षांपासून व्याख्यानमालेच्या माध्यमातून वैचारिक मेजवानी देण्याचे काम दीनदयाळ नागरी सहकारी बँक अव्याहतपणे करीत आहे. या उपक्रमाचे हे २२ वे वर्ष आहे. या उपक्रमांतर्गत आजपावेतो सदर व्याख्यानमालेत अनेक थोर विचारवंत, कलावंत, लेखक, साहित्यिक, पत्रकार, अर्थतज्ज्ञ, इतिहास संशोधक, अध्यात्मिक व धार्मिक क्षेत्रातील व्यक्तींनी रसिकांना वैचारिक मेजवानी देवून वेळोवेळी आपले अनमोल विचार मांडलेले आहेत. यावर्षी ही युगप्रवर्तक स्वामी विवेकानंद यांच्या १६१ व्या जयंतीनिमित्त १० ते १२ जानेवारी २०२४ दरम्यान दररोज सायंकाळी ६.३० वाजता (तीनही दिवस) खोलेश्वर माध्यमिक विद्यालय, कुत्तर विहिर, अंबाजोगाई या ठिकाणी आयोजित व्याख्यानमालेसाठी बुधवार, दि.१० जानेवारी रोजी ह.भ.प.शिरीष महाराज मोरे (देहु) यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यांच्या व्याख्यानाचा विषय शिवराज्याभिषेकाची ३५० वर्षे असा ▶▶ पान २ वर

## वेगवेगळ्या अपघातात दोन ठार

**बीड । प्रतिनिधी**

येथून अंबाजोगाईकडे जाताना दुचाकीचा अपघात होऊन उपचारादरम्यान लाईनमनचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी ( दि.५) सायंकाळी घडली आहे. या घटनेने धारुर व आडस येथे महावितरण कर्मचारी व नागरिकांमधून दुःख व्यक्त केले जात आहे.बीड तालुक्यातील चौसाळा येथील तरूण हा अहदनगर येथे नातेवाईकांना भेटण्यासाठी गेला असता त्याच्या मोटारसायकलला ट्रकने धडक दिल्याने त्याचा अपघाती मृत्यू झाला. महेश चंद्रकांत गिरी (वय ३० वर्ष ) रा. बनसारोळा ( ता. केज ) हल्ली मुकाम अंबाजोगाई असे मयत लाईनमनचे नाव आहे. ते मागील काही वर्षांपासून धारुर येथे महावितरण कंपनीमध्ये लाईनमन म्हणून कार्यरत आहेत. मागे काही महिन्यांपूर्वी आडस येथेबदली झाली परंतु त्यांच्या काही शारिरीक अडचणींमुळे त्यांना धारुर येथे कर्तव्यावर ठेवण्यात आले.गिरी नियमित अंबाजोगाई तेधारुर असा दुचाकीवरून प्रवास करत असतं. शुक्रवारी (दि.५) नेहमीप्रमाणे ते दुचाकीवरून धारुर येथून अंबाजोगाईला जात होते दरम्यान ते आडस येथून ५ किमी अंतरावरील केंद्रेवाडी शिवारातील आश्रम शाळेजवळ आले असता दुचाकीवरून पडल्याने गंभीर जखमी झाले. स्थानिक नागरिकांनी मदत करत त्यांना तातडीने अंबाजोगाई येथे स्वाराती रुग्णालयात दाखल केले. येथे उपचार करुन पुढील उपचारासाठी लातूर येथे घेऊन जाताना त्यांचे निधन झाले. ही घटना ▶▶ पान २ वर

## जिल्ह्यात दुचाकी चोरींचे प्रमाण वाढले

**बीड । प्रतिनिधी**

बाथरूम साठी जाताच चोरट्याने एका व्यक्तीची मोटार सायकल व मोबाईल चोरून नेल्याची घटना केज अंबाजोगाई रोडवरील पिसेगाव फाटा येथे घडली आहे. या प्रकरणी अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बीड जिल्ह्यात मोटार सायकल चोरीच्या घटना दिवसे दिवस वाढत चालल्या आहेत. दररोज कुठे ना कुठे मोटार सायकल चोरीला जावू लागली. जिल्ह्यात मोटार सायकल चोरणार्या टोळ्या सक्रीय असल्याचे दिसुन येवू लागले. शासकीय कार्यालयासह इतर ठिकाणाहून गाड्या चोरीला जावू लागल्या आहेत. सुरेश बंडू गायकवाड (रा.आनंदगाव ता.केज) हे केज अंबाजोगाई रोडवरील पिसेगाव फाटा येथे गाडी उभी करून बाथरूमला ▶▶ पान २ वर

## येळंबघाट येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाचा छापा; बनावट दारु जप्त

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील येळंबघाट येथील हॉटेल समृद्धी बियर बार मध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाने टाकलेल्या छाप्यात गोवा राज्यातील बनावट दारूची अवैध विक्री होत असल्याचे दिसून आले. येथे जवळपास दीड लाखाची बनावट दारू जप्त करण्यात आली. याविषयी सविस्तर वृत्त असे की, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक विश्वजीत देशमुख यांच्या



मार्गदर्शनाखाली दिनांक ५ जानेवारी २०२४रोजी मिळालेल्या माहितीच्या आधारे मौजे येळंबघाट गावच्या हद्दीत हॉटेल समृद्धी बिअर बार अँण्ड परमिट रूम येथे निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक, बीड च्या पथकाने छापा टाकला. असता गोवा राज्य बनावटीचा व महाराष्ट्र राज्यामध्ये विक्रीस प्रतिबंधीत असलेला मुद्देमाल पुन्हा बाटलीत भरून विक्री करीत असताना मिळून आला. सदरील ठिकाणी अनुक्रमे ॲड्रियल व्हिस्कीच्या ७५० मिली क्षमतेच्या २४ बाटल्या, मॅक्डॉल नंबर १ व्हिस्कीच्या १८० मिली क्षमतेच्या ▶▶ पान २ वर

## राज्य मार्गावरील टोलनाक्यावर वाहतुकीस अडथळा कंत्राटदारांचा मनमानी कारभार -डॉ.ढवळे

**पाटोदा । प्रतिनिधी**

अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावरील मांजरसुंभा ते चुंभळीफाटा ३३ किलोमीटर लांबीच्या किंमत १६६ कोटी रुपयांच्या रस्त्याचे काम मधुकान -श्रीहरी- हुले कन्स्ट्रक्शन मार्फत करण्यात आले असुन पाटोदा तालुक्यातील वैद्यकिन्ही याठिकाणी मागील काही दिवसांपासून टोलनाका सुरू झाला असुन वर्दळीचा मार्ग असल्याने लहान मोठ्या वाहनांची दिवस रात्र धावताना दिसतात.येथील टोलनाक्यावरील एका बाजुच्या ३ लेन पैकी केवळ १ लेन सुरू असुन ईतर लेन बंद असतात.केवळ एकच लेन वाहतुकीसाठी खुली असल्याने या ठिकाणी वाहनांच्या रांगा लागतात.वाहन धारकांना पैसे मोजून नाहक वेळ खर्च करावा लागत आहे.बंद लेन विषयी विचारणा केल्यावर वाहनधारक आणि कर्मचारी यांच्यामध्ये वादविवाद निर्माण होतात.भरमसाठ टोल वसुली करून योग्य सुविधा मिळत नसतील तर मग टोल भरायचा तरी कशासाठी असा संतप्त सवाल वाहनधारक करत आहेत. तसेच टोल नाक्यावरील रबरी गतिरोधके तुटलेली असुन लोखंडी खिळे उघडे पडल्याने वाहनांचे टायर फुटल्याने अपघाताचा धोका वाढला आहे.याकडे कंत्राटदार, कर्मचारी यांचे दुर्लक्ष असुन तातडीने दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी मुख्य अभियंता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या) मुंबई,अधिक्षक अभियंता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ छत्रपती संभाजीनगर यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे. दुचाकी वाहनांसाठी साठी जो खुला मार्ग सोडायला हवा त्याठिकाणी ड्रम व बरीकेट्स ऊभी केली जात आहेत त्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. कार्यरत कर्मचारी वाहनचालकांना उद्धट वागणूक देतात यामुळे वाद निर्माण होत आहेत. तसेच टोलनाक्यावरील गतिरोधक दुरावस्थेत असुन तुटल्याने खिळे उघडे पडले आहेत. वाहनांचे टायर फुटुन अपघाताची दाट शक्यता आहे.मात्र याकडे कंत्राटदार आणि कार्यरत कर्मचारी यांचे दुर्लक्ष आहे.त्यामुळे त्याठिकाणी तातडीने खिळे उघडे पडलेल्या गतिरोधकांची दुरुस्ती करण्यात यावी.